Soc. Reg. MAH / 217 / Pune / 79 Trust No. F-1313

Regd. Office : 39/28 Samadhan Apartment, Kacharewadi, Pune 411 004.

E-mail : punebnp@yahoo.co.in; deuskarster@gmail.com
Website : www.niveditapune.org

# भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, पुणे.

# Bhagini Nivedita Pratishthan Pune

## वार्षिक अहवाल २०११ - २०१२

## Annual Report 2011 - 2012

**● केंद्रे ●**

८७४, सदाशिव पेठ , पुणे ४११ ०३०.

७, भूपती कॉम्प्लेक्स,९८५ सदाशिव पेठ ,
पुणे ४११ ०३०.

गायकवाड नगर, दिघी, पुणे ४११ ०१५
दूरध्वनी : २०२७१५८९

**● CENTRES ●**

Bhagini Nivedita Pratishthan
874, Sadashiv Peth,
Vasukaka Joshi Trust,
Near Purandare Class,
Pune 411 030.

Flat No.7 Bhupati Complex,
1st Floor, 985 Sadashiv Peth,
Near Jnana Prabodhini,
Pune 411 030.

Gaikwad Nagar, Dighi,
Pune 411 015.
Tel.: 27157593

# भगिनी निवेदिता प्रतिष्ठान पुणे

## उपक्रम २०११-२०१२



# भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, पुणे

सोसा. रजि. : MAH / 217/ Pune/79. ट्रस्ट नं. F-1313
पत्ता : ७, भूपति कॉम्प्लेक्स, ९८५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन २४४५९७३४ E-mail : punebnp@yahoo.co.in
Website : www.niveditapune.org
पत्रव्यवहारासाठी पत्ता : वरील प्रमाणे

## कार्यकारी मंडळ २०११-१२

### श्रीमती लीलाताई शिंत्रे - संस्थापक अध्यक्ष

| क्र | नाव | पत्ता | पद | व्यवसाय |
|---|---|---|---|---|
| १. | प्रतिमा जोशी | २०३६, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे ४११ ०३०. | अध्यक्ष | समाजसेवा व उद्योजिका |
| २. | नीलिमा कारखानीस | २७/२७३, विठ्ठल रखुमाई सोसायटी, हिंगणे खुर्द, पुणे ४११ ०५२ | उपाध्यक्ष | प्रशिक्षित समाजसेविका |
| ३. | ऋजुता पितळे | सलोनी अपार्टमेंट, आयडिअल कॉलनी, पुणे ४११ ०२९. | सचिव | निवृत्त शिक्षिका |
| ४. | वंदना केळकर | श्रीगणेश अपार्टमेंट, गुजरात कॉलनी, पुणे ४११ ०३८ | सह सचिव | समाजसेविका |
| ५. | उषा साठे | निकिता पार्क, ९०२, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४ | कोषाध्यक्ष | समाजसेविका |
| ६. | सुलभा देऊस्कर | 'समाधान' प्रभात रोड, ९वी गल्ली, पुणे ४११ ००४ | सदस्य | निवृत्त प्राध्यापक |
| ७. | वसुंधरा केळकर | ५०८, गोपाळ विहार, कोथरूड, पुणे ४११ ०२९ | सदस्य | निवृत्त शिक्षिका व समुपदेशक |
| ८. | मंजिरी सातपुते | उत्तरा हौ.सोसायटी, प्रभात रोड, ६वी गल्ली, पुणे ४११ ००४ | सदस्य | समाजसेविका |
| ९. | प्रणोती गर्गे | श्रीकृपा, सहकारी वसाहत, एरंडवणे, पुणे ४११ ००४ | सदस्य | समाजसेविका |
| १०. | प्रतिभा धडफळे | अ/२५, 'गणेश', तुळशीबागवाले कॉलनी, पुणे ४११ ००९ | सदस्य | समाजसेविका |
| ११. | अमीता कुलकर्णी | ७, श्रीराम कृपा, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११ ०३८ | सदस्य | लेक्चरर |
| १२. | विठाबाई मोरे | मु.पो.चिखली, आळंदी देहू रोड, पुणे ४११ ०१४. | स्वीकृत सदस्य | दिघी वसतिगृह अधिक्षक |

# भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, पुणे

## वार्षिक अहवाल सन २०११–१२

सप्रेम नमस्कार,

**भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, पुणे** ही संस्था गेली ३२ वर्षे (१९७९ पासून) आर्थिक व सामाजिक दुर्बल घटकातील महिला व बालकांचा सर्वांगिण विकास याच ध्येयाने प्रेरित होऊन कार्यरत आहे. सर्व कुटुंबालाच केंद्रस्थानी मानून शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, आरोग्य विषयक क्षेत्रात संस्था निष्ठेने काम करीत आहे. निरलसपणे काम करणारे कार्यकर्ते, देणगीदार व हितचिंतक हे संस्थेचे आधारस्तंभ आहेत.

२०११–१२ या वर्षातील संस्थेच्या उपक्रमांचा अहवाल सादर करताना आम्हाला आनंद होत आहे.

**वार्षिक सर्वसाधारण सभा** :

२०१०–११ या वर्षीची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दि. ७ जुलै २०११ रोजी भूपती कॉम्प्लेक्स येथील संस्थेच्या कार्यालयात झाली. घटनेतील तरतूदीप्रमाणे प्रतिमा जोशी व सुलभा देऊस्कर निवृत्त झाल्या व कार्यकारिणी मंडळावर पुन्हा निवडून आल्या. प्रतिमा जोशी यांची अध्यक्ष म्हणून पुन्हा एकमताने निवड झाली. वैजयंती जोशी व सरिता भट निवृत्त झाल्या. प्रतिभा धडफळे व अमीता कुलकर्णी यांची निवड करण्यात आली तर कर्मचारी प्रतिनिधी म्हणून विठाबाई मोरे यांची एक वर्षाकरिता निवड करण्यात आली.

सभेमधे २०१०–११ च्या अहवालाचे वाचन करून अहवाल सर्वानुमते संमत करण्यात आला. त्याच प्रमाणे २०१०–११चा ऑडिट रिपोर्टही एकमताने संमत करण्यात आला.

ऑडिटर संजीव गोखले यांची २०११ – १२ साठी ऑडिटर म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात आली.

सल्लागार समितीची गुरूवार दि.३१.५.२०११ रोजी सभा घेण्यात आली. संस्थेच्या विविध उपक्रमांचा अहवाल समितीला सादर करण्यात आला व त्यावर चर्चा झाली.

**श्रद्धांजली** :

संस्थेच्या माजी उपाध्यक्ष सौ.वैजयंती जोशी यांचे दि.१७.२.१२ रोजी दुःखद निधन झाले. संस्थेच्या विविध उपक्रमात त्यांचा मोलाचा सहभाग होता. संस्थेच्या सर्व कार्यकर्त्यांतर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली.

**विशेष उपक्रम** :

१. संस्थेच्या ऑफिसचे सदाशिव पेठेतील नवीन जागेत स्थलांतर झाले आहे.

२. दिघी येथील महिलांसाठी 'सुंदर माझे स्वच्छ घर' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत ६० महिलांनी भाग घेतला. दीपाराणी सहस्त्रबुद्धे, हेमलता वडापूरकर, सायली पलांडे व विनया दीक्षित यांनी परीक्षक म्हणून काम केले. विजेत्या महिलांना परितोषिके देण्यात आली. ४ फेब्रुवारी २०१२ रोजी स्पर्धेचा बक्षीस समारंभ मानवी संसाधन व विकास सल्लागार (Human Resource Development Consultant) सौ. रेखा फडके यांच्या हस्ते झाला. मा. नगरसेवक दत्ताजी गायकवाड समारंभाला उपस्थित होते. पुढील महिलांना बक्षिसे देण्यात आली.

प्रथम क्रमांक : जया हेडाऊ
द्वितीय क्रमांक (विभागून) : मंदाकिनी भांडे पाटील व वर्षा मुळे
तृतीय क्रमांक (विभागून) : नलिनी पवार व वैशाली चव्हाण
यमाई नगर विभाग : लीला साळुंखे

स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व महिलांना फुलांची रोपे भेट देण्यात आली.

३. १० ऑक्टोबर २०११ रोजी भगिनी निवेदिता यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वैविध्यपूर्ण क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या १० महिलांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्या सुप्रसिद्ध नृत्यांगना सुचेता भिडे चापेकर यांच्या हस्ते रोख रू.१००० व मानपत्र सत्कारार्थींना देण्यात आले. खालील महिलांचा सत्कार करण्यात आला.

१.ॲडव्होकेट पल्लवी रेगे २.आशा पोतदार ३.डॉ.रितू बियाणी ४.माया तुळपुळे ५.डॉ.शालिनी पटवर्धन ६.सायली पलांडे ७.सीमा दाबके ८.सत्त्वशीला सामंत ९.शुभदा जोशी १०.डॉ. प्रतिभा जोग

४. १४ जानेवारी २०१२ रोजी 'शब्दवेध' संस्थेबरोबर कर्णबधीर विद्यार्थ्यांसाठी संगणकावर चित्र काढणे, अंक ओळखणे, पाठांतर, अभिनय गीत, चित्रावरून गोष्ट सांगणे अशा स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात ६० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

५. २२ नोव्हेंबर २०११ रोजी एकलव्य बाल शिक्षण व आरोग्य न्यास या संस्थेतील १०वीच्या बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमातील प्रयोग प्रत्यक्ष करून बघण्याचा उपक्रम घेतला.

६. स्नेहदीप, जनकल्याण फौंडेशन या संस्थेच्या स्पॉन्सरशिप प्रकल्पातील १०वीच्या मुलांसाठी सराव परीक्षा घेण्यात आली व पेपर तपासून देऊन त्यांना मार्गदर्शन केले.

७. दिघीमध्ये यमाईनगर ही ३०–४० पाले/झोपडया असलेली वस्ती आहे. 'सुंदर माझे घर' या स्पर्धेच्या निमित्ताने तेथील सर्वेक्षण केले त्यावेळी या वस्तीमध्ये अस्वच्छता, निरक्षरता, मुलांमध्ये शिक्षणाचा अभाव, अज्ञान अशा अनेक समस्या आढळून आल्या. संस्थेच्या

समाजसेविका उज्वला गायकवाड यांनी वारंवार वस्तीमध्ये जाऊन मुलांशी, पालकांशी संपर्क साधला. मुलांमध्ये व पालकांमध्ये शिक्षणाबद्दलची आवड दिसून आली. संस्थेतर्फे मुलांना शिकविण्यासाठी वर्ग सुरू करण्यात आला. वस्तीतील लोकांबरोबर सभा घेण्यात आली. व त्याचा प्रतिसाद म्हणजे त्या लोकांनी वर्गासाठी जागाही उपलब्ध करून दिली.

८. दि. ५ डिसेंबर २०११ रोजी उषाताई साठे विवाह मंडळाच्या सर्व सदस्यांनी संस्थेला भेट दिली. संस्थेच्या उपक्रमाविषयीचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन त्यांच्या समोर सादर करण्यात आले.

९. डिसेंबर २१ ते २५, २०११ दरम्यान आंतरराष्ट्रीय चित्पावन संघ आयोजित ‘ग्लोबल बिझनेस कॉन्फरन्स अँड बिझनेसेस’ या प्रदर्शनात संस्था सहभागी झाली होती. प्रदर्शनात संस्थेमध्ये तयार झालेल्या वस्तू मांडण्यात आल्या. व त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला.

**आरोग्य विषयक उपक्रम** :

पुणे व दिघी येथील बाराक्षार व होमिओपॅथी दवाखान्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. २०११-१२ या वर्षात सुमारे ९३५ लोकांनी याचा लाभ घेतला. नियमित औषधोपचारांबरोबरच येथे विशेष आजारांच्या उपचारासाठी मार्गदर्शन व संदर्भसेवाही पुरवली जात आहे. दिघी येथील श्री.हेडाऊ यांच्या पाठीच्या कण्यावरील टयुमरचे ऑपरेशन संस्थेच्या मार्गदर्शनामुळे दीनानाथ मंगेशकर रूग्णालयात मोफत करण्यात आले. डॉ.प्रद्युम्न रायतूरकर यांनी हे ऑपरेशन केले

अभ्यासिकेतील मुलांची हिमोग्राम तपासणी संस्थेतर्फे करण्यात आली. ही सुविधा डॉ.विजय व डॉ.कुंदा कर्णिक यांनी सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिली.

महिलांसाठी योगासन वर्गाचे आयोजन करण्यात आले. श्रीमती प्रतिमा देशपांडे या तज्ज्ञांचे वर्गाला मार्गदर्शन लाभले. १५ महिलांनी या वर्गाचा लाभ घेतला.

**परिसेविका प्रशिक्षण वर्ग** :

गेली २१ वर्षे हा प्रशिक्षण वर्ग अविरतपणे चालू आहे आणि महिलांना स्वतःच्या पायावर उभे रहाण्यासाठी मदत करत आहे. या वर्षी ४ जुलै ११ पासून ४२वा वर्ग चालू झाला. या प्रशिक्षणार्थी व संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी जनकल्याण रक्तपेढीस भेट दिली. तेथे सर्वांची रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी मोफत करण्यात आली.

दि.२७ नोव्हेंबर २०११ रोजी ४०व्या वर्गाच्या विद्यार्थिनींना प्रमाणपत्रे देण्यात आली. या वेळी विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले व त्यांच्या प्रगतीचे श्रेय संस्थेला दिले. कमला नेहरू हॉस्पिटलमध्ये प्रशिक्षण देणाऱ्या सिस्टर उर्मिला भालेराव यांचा सेवानिवृत्ती व अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेतर्फे मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

**कर्णबधिरांसाठी वाचा सुधार केंद्र :**

कर्णबधिरांसाठी मार्गदर्शनाचे व समुपदेशनाचे काम गेल्या वर्षीपासून सुरू झाले होते. २ मे २०११ रोजी वाचा सुधार केंद्राची सुरवात करण्यात आली. माधुरी प्रभुणे, माधवी देशपांडे, ज्योत्स्ना चिपळूणकर व माधुरी लोहकरे या शिक्षिका केंद्राचे काम पाहतात.

**किशोरी विकास प्रकल्प :**

किशोर वय हा जीवनातील अतिशय नाजुक टप्पा आहे. तारूण्य व बालवय याना जोडणारा हा दुवा आहे. भावी आयुष्याच्या दृष्टीने योग्य जडण घडण होण्यासाठी या वयात मार्गदर्शनाची खूप आवश्यकता असते. यासाठी संस्थेने गेल्या वर्षीपासून किशोरी विकास प्रकल्प चालू केला. त्याला मुलींकडून खूपच चांगला प्रतिसाद मिळाला. या मधे, या वयातील शारीरिक, मानसिक बदल, आरोग्य व आहाराचे महत्व, तसेच संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व विकास तसेच आत्मविश्वास, स्त्री पुरूष समानता, शिक्षणाचे महत्व अशा वेगवेगळया विषयांवर निरनिराळे खेळ, चर्चा व मनोरंजनाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.

या वर्षी अधिक मुलींपर्यंत पोचण्यासाठी दिघी येथील म.न.पा व रामचंद्र गायकवाड शाळेमध्ये ७वी च्या वर्गासाठी मुख्यध्यापकांच्या सहकार्याने हे उपक्रम सुरू करण्यात आले. विशेष म्हणजे यामध्ये मुलांचाही समावेश करण्यात आला.

**संगणक प्रशिक्षण वर्ग :**

संगणक साक्षरता ही सध्याच्या युगात अतिशय महत्वाची आहे. तसेच नोकरीसाठीही संगणक प्रशिक्षण आवश्यक आहे. हे संगणकाचे महत्व ओळखून संस्थेतर्फे निरनिराळया प्रकारचे प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जातात. दर वर्षीप्रमाणे DTP, IT, Tally हे शासनमान्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम या वर्षीही घेतले गेले. त्या मध्ये ४० प्रशिक्षणार्थी होते. महिलांसाठीही संगणकाच्या बेसिक कोर्सचे आयोजन केले होते. या मध्ये ११ महिलांचा सहभाग होता. त्यामध्ये स्नेहदीप जनकल्याण फौंडेशन संस्थेमधील ५ कर्मचा–यांचाही समावेश होता. तसेच याच संस्थेच्या १५ विद्यार्थ्यांसाठीही Computer Fundamental चा कोर्स घेण्यात आला. या दोन्ही कोर्सचे प्रशस्तीपत्र वितरण IBM चे Country Manager डॉ.भूषण केळकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी IBM Foundation तर्फे संस्थेला Laptop भेट दिला. कोर्सच्या विद्यार्थ्यांना Online Job Applications भरण्यासंबंधी त्यांनी मार्गदर्शन केले. शोभना परांजपे व संध्या पालव यांनी या वर्गाला मार्गदर्शन केले.

**महिला व्यवसाय प्रशिक्षण :**

महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन त्यांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी करण्यासाठी त्यांना वेगवेगळया प्रकारचे व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. यावर्षी एप्रिल महिन्यात भरतकामाचा वर्ग

तसेच दिघी येथे शिवणाचा वर्ग घेतला गेला. त्याचा लाभ २५ महिलांनी घेतला.

कापडाच्या भूमितीय आकाराच्या तुकडयापासून पिशव्या, पर्सेस, दुपटी, कुशन कव्हर्स, रजई, गोधडी बनविण्याचे प्रशिक्षण तनुजा देशपांडे यांनी दिले.

स्मिता धर्माधिकारी यांनी पाण्यावरील रांगोळी व क्रोशाच्या सुईने साडीवर विणण्याचे प्रशिक्षण दिले.

२६ नोव्हेंबर २०११ रोजी महिलांना स्वयंरोजगाराला प्रवृत्त करण्यासाठी संस्थेतील सभासद कर्मचारी व दिघी येथील महिलांनी टाटा मोटर्स गृहिणी प्रकल्पाला भेट दिली.

**विज्ञान व तंत्रज्ञान** :

संस्थेच्या विज्ञान केंद्रामार्फत गेल्या वर्षीप्रमाणे शाळेत जाऊन विज्ञान प्रयोग करून घेण्याचा उपक्रम चालू केला आहे. या वर्षीही त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. सेंट क्रिस्पिन्स होम्स, ज्ञानदा प्रतिष्ठान संचालित डि.आर. नगरकर प्रशाला, रत्नप्रभा मोहिते पाटील शाळा व दिघी येथील रामचंद्र गायकवाड विद्यालय या शाळांमध्ये ५वी ते ७वीच्या मुलांसाठी प्रयोग घेतले. तसेच रत्नप्रभा मोहिते पाटील विद्यालयातील ८वी व ९वीच्या मुलांसाठी प्रयोग घेण्यात आले.

रोबोटिक्स कार्यशाळेच्या उपक्रमालाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. रत्नप्रभा मोहिते पाटील विद्यालय, रोटरी क्लब ऑफ युनिव्हर्सिटी, महिंद्रा लाइफ स्पेस प्रा.लि. यांच्या सहकार्याने वेगवेगळया शाळांमध्ये या कार्यशाळा घेण्यात आल्या. याचा एकूण २०८ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. यामधे विठ्ठलराव जोशी चॅरिटी ट्रस्टतर्फे डेरवण येथील कार्यशाळेचाही समावेश आहे. (त्यात १२ मुलांनी सहभाग घेतला होता).

२५ फेब्रुवारी २०१२ रोजी विज्ञान दिनानिमित्त दिघी येथील विज्ञान प्रयोग शाळेत विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते. त्याला विद्यार्थी, पालक व गुरूकुल अध्यापक विद्यालयातल शिक्षक व विद्यार्थी यांनी भेट दिली. विद्यार्थ्यांनी प्रयोग मांडून स्वतः त्यांची माहिती सांगितली.

**अभ्यासिका** :

गेली १३ वर्षे यशस्वीपणे १ली ते ७वीच्या मुलामुलींसाठी अभ्यासिका चालविली जाते. शालेय अभ्यासाबरोबरच मुलांच्या व्यक्तिगत विकासाकडेही वैयक्तिक लक्ष दिले जाते. रोज मुलांना पोषक खाऊ देण्यात येतो. दरवर्षी प्रमाणे या वर्षीही विविध सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात आले. १५ ऑगस्ट २०११ रोजी दिघी येथे चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यात ५० मुलांनी भाग घेतला. परिक्षक म्हणून चारूता खामकर यांनी सहकार्य केले. २६ जानेवारी २०१२ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमास सौ व श्री बाळकृष्ण कुलकर्णी (वास्तूशोध कंस्ट्रक्शन कंपनी) प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. त्यांच्या हस्ते मुलांना बक्षिसे देण्यात आली.

या वर्षीही सुट्टीतील छंद शिबिरे घेण्यात आली. रत्नप्रभा मोहिते पाटील विद्यालय, मानव्य संस्था व दिघी येथील अभ्यासिकेची मुले यात आनंदानी सहभागी झाली होती.

अभ्यासिकेतील मुलांची सहल आगाखान पॅलेस येथे गेली होती. शुभदा जोशी व त्यांच्या सहकारी यांनी कात्रणांचे प्रदर्शन मांडले होते. (सकाळ, लोकमत, पुढारी, म.टाईम्स इ. वर्तमानपत्रातील बालमित्र, विज्ञान, गोष्टी, लेखक, विनोद, कुतुहुल, आश्चर्य इ.च्या फाईल्स बनविल्या होत्या).

**सांस्कृतिक कार्यक्रम** :

दि.६.४.११ रोजी रसमयी वाचन मंडळातर्फे 'शब्दांकन /मुलाखती घेताना प्रसिद्ध व्यक्तिंचे आलेले अनुभव' या विषयावर प्रसिद्ध अनुवादक लेखिका शोभा बोंद्रे यांचे व्याख्यान झाले. तसेच रसमयी वाचन मंडळ व संस्थेच्या विज्ञान केंद्रातर्फे 'दैनंदिन जीवनातील रसायन शास्त्र' या विषयावर प्राध्यापिका (मॉडर्न कॉलेज) डॉ.सुषमा जोग यांचे व्याख्यान झाले. International Chemistry Year च्या निमित्ताने हे व्याख्यान आयोजित करण्यात आले. दैनंदिन जीवनातील रसायन शास्त्राची शास्त्रशुद्ध माहिती खूपच उद्बोधक वाटली.

दि.२२.१०.२०११ रोजी दिवाळी निमित्त पुणे व दिघी कर्मचारी कार्यकारी मंडळ सभासद, अभ्यासिकेतील मुले व दिघी ग्रामस्थ यांच्यासाठी हिंदी मराठी गाण्यांचा कार्यक्रम आयोजित केला होता. HDFC बँकेच्या सहकार्याने हा कार्यक्रम झाला.

**आदान प्रदान** (Interaction) :

संस्थेच्या निरनिराळया अभिनव उपक्रमांना आता इतर शैक्षणिक, समाजसेवी व कार्पोरेट संस्थांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

Friends of Germany (Bremen), रोटरी क्लब ऑफ पूना वेस्ट, पर्सिस्टंट, उषाताई साठे विवाह मंडळ, अरूणकुमार पंडित, Give India यांच्या कडून सातत्याने संस्थेच्या उपक्रमांना अर्थसहाय्य मिळत आहे. HDFC Bank Ltd. तर्फे वाचासुधार केंद्रासाठी व इतर उपक्रमांसाठी आर्थिक सहाय्य मिळाले.

यांच्या सर्वांच्या सहकार्याने संस्थेचे विविध उपक्रम अतिशय उत्तम प्रकारे चालू आहेत.

समाजातील गरजू, उपेक्षित महिला व मुली तसेच एकाकी स्त्रिया यांनी सक्षम व स्वावलंबी व्हावे तसेच त्यांनी स्वतःचे आयुष्य सन्मानाने, धैर्याने, निर्भिडपणे जगण्यास सर्वार्थाने समर्थ व्हावे हाच संस्थेचा उद्देश आहे. आमची संस्था राबवीत असलेले बहुउद्देशीय व भिन्न क्षेत्रातील उपकमांचे यश यातच सामावले आहे.

**हे यश मिळविण्यासाठी आमचे हितचिंतक, देणगीदार, कार्यकर्त्या भगिनी व विविध क्षेत्रातील मान्यवर यांचा सकिय हातभार हेच आमच्या संस्थेचे बलस्थान आहे.** त्याबद्दल संस्था त्यांची सदैव ऋणी आहे.

देणगी स्वीकारण्यासाठी संस्थेला **आयकर कलम ८० जी अंतर्गत करांत सवलत** आहे. २००३ साली संस्थेला परकीय चलनात देणगी स्वीकारण्याचीही (**F.C.R.A**) मान्यता मिळाली आहे. आपला धनादेश **भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, पुणे** या नावे काढावा. संस्थेच्या कार्यात आपला बहुमोल वेळ, कल्पना, सूचना यांचे मनापासून सदैव स्वागत आहे.

संस्थेच्या विविध उपकमांचा विस्तार चालू असताना त्याला योग्य गती मिळण्यासाठी संस्थेच्या जागेत सोयी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असते. अभ्यासिका व संगणक वर्ग यांचे नूतनीकरण करणे गरजेचे आहे. तसेच मुलांचा विकास व आरोग्य या साठी इतर सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. स्त्रियांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी काही नवीन योजना आहेत. या सर्वांसाठी अर्थातच निधी संकलन करणे गरजेचे आहे. **संस्थेच्या या कार्य विस्तारासाठी आपल्या कडून सक्रीय आर्थिक सहकार्याची अपेक्षा आहे.**

**ऋजुता पितळे**
**सचिव**

**प्रतिमा जोशी**
**अध्यक्ष**

## सल्लागार समिती

श्रीमती लीला शिंत्रे, संस्थापक अध्यक्ष – भ.नि.प्र. पुणे
श्री. सदानंद आपटे (निवृत्त कर्नल)
श्री. अजित आपटे, सामाजिक कार्यकर्ते, नगरसेवक – म.न.पा. पुणे
श्री. दत्ताजी गायकवाड, नगरसेवक – पिंपरी चिंचवड नगरपालिका
डॉ. आनंद पटवर्धन, होमिओपॅथिक सल्लागार
डॉ. लतिका दातार , होमिओपॅथिक सल्लागार
श्री. डी.आर. दातार, माजी प्राचार्य – Co-operative Management Institute
श्री. विनय तांबे, आर्किटेक्ट
श्री. अरविंद शाळीग्राम, प्राध्यापक पुणे विद्यापीठ
श्री. शिबू नायर, संगणक तज्ञ

## संस्थेचे कामकाज खालील समित्यांमार्फत केले जाते.

**१. दिघी वसतिगृह :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रतिमा जोशी | उषाताई साठे | वंदना केळकर | ललिता मराठे | प्रणोती गर्गे |
| विठाबाई मोरे | लक्ष्मी अडागळे | | | |

**२. अभ्यासिका व विज्ञान केंद्र :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| लीलाताई शिंत्रे | किशोरी बेलसरे | सुलभा देऊस्कर | नीलिमा कारखानीस | सुलोचना खामकर |
| वसुंधरा केळकर | भारती खुर्जेकर | जयश्री व्हटकर | कला जोशी | अनघा तारे |
| मंजुषा मुंगी | सुचित्रा परचुरे | राजश्री गाडगीळ | रंजना देवल | सुनयना पोपळभट |
| मोहिनी कांबळे | रोहिणी टेकावडे | निकिता चौगुले | रजनी देवल | रागिणी तुळसे |
| दीपाली गायकवाड | | | | |

**३. संगणक वर्ग :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सुलभा देऊस्कर | मधुवंती केळकर | संध्या पालव | शोभना परांजपे | सुरेखा परांडे |
| अमृता कुलकर्णी | | | | |

**४. किशोरवयीन विकास प्रकल्प :**

| | | |
|---|---|---|
| नीलिमा कारखानीस | मधुवंती केळकर | उज्वला गायकवाड |

**५. नर्सिंग व पॅरामेडिकल वर्ग :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रतिमा जोशी | मंजिरी सातपुते | शारदा शिंत्रे | ललिता मराठे | वसुधा भंडारे |
| माधुरी केतकर | प्रणोती गर्गे | सिस्टर भालेराव | वंदना केळकर | सुलोचना खामकर |

**६. बाराक्षार / होमिओपॅथी दवाखाना व आरोग्य प्रकल्प :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| लतिका दातार | सुमीता अभ्यंकर | वंदना केळकर | माणिक शेवगावकर | सुनीता परांजपे |
| नीला सिधये | मीना दामले | प्राची जोशी | डॉ.कल्याणी बापट | सुलभा मेंहदळे |
| शुभदा दामले | माधवी जोशी | | | |

**७. कर्णबधिर वाचा सुधार केंद्र :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ऋजुता पितळे | माधुरी लोहकरे | ज्योत्स्ना चिपळूणकर | माधवी प्रभूणे | माधुरी देशपांडे |

**८. विविध स्वयंरोजगार प्रशिक्षण वर्ग :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शालिनी पटवर्धन | सुलभा देऊस्कर | प्रज्ञा बोरोले | जयश्री व्हटकर | चित्रा बोरोले |

**९. साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रम :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रतिमा जोशी | शारदा शिंत्रे | वसुंधरा केळकर | प्रणोती गर्गे | प्रतिभा धडफळे |
| सुहासिनी भालेराव | किशोरी बेलसरे | अमृता कुलकर्णी | | |

**१०. रसमयी वाचन मंडळ :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| लीलाताई शिंत्रे | किशोरी बेलसरे | स्मिता सहस्त्रबुद्धे | सुहासिनी भालेराव | ललिता मराठे |

**११. कार्यालयीन व्यवस्थापन :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रतिमा जोशी | सुलभा देऊस्कर | वैजयंती जोशी | ऋजुता पितळे | नीलिमा कारखानीस |
| उषाताई साठे | जयश्री व्हटकर | अमृता कुलकर्णी | प्रज्ञा बोरोले | |

**१२. भावी प्रकल्प व योजना :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| लीलाताई शिंत्रे | प्रतिमा जोशी | सुलभा देऊस्कर | ऋजुता पितळे | नीलिमा कारखानीस |
| मधुवंती केळकर | | | | |

# Bhagini Nivedita Pratishthan, Pune

## Beneficiaries

| Name of Activity | No. of Beneficiary 2011-12 | Till date |
|---|---|---|
| Non Formal Education: (Self Study Centre/Abhyasika) (both at Pune and Dighi) | 238 | 1220 |
| Computer Training : (Dighi and Pune) | 66 | 1700 |
| Nursing | 5 | 806 |
| Homoeopathic dispensary : (both at Pune and Dighi) | 935 | 2237 |
| Science Center Activities at Dighi, Pune : | | |
| For students of 5th, 6th and 7th std. | 779 | 2488 |
| Special Sc. programs for Women (lectures, training etc) | 200 | 382 |
| Robot Workshop | 208 | 266 |
| Vocational Skill Training, exposure visit | 49 | 235 |
| Adolescent Girls Group | 200 | 255 |
| Workshops | 30 | 30 |
| Health related activities | 104 | 241 |
| Hostel : students, working women | 40 | 210 |
| Cultural Activities for women | 75 | 105 |
| Rasamayee Vachan Mandal | 18-20 members for last 9 years | |

# Donation Details of B.N.P. for 2011-12

## Donations from Organizations - 2011-12

| No. | Name | Amount | No. | Name | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1. | HDFC Bank | 636000 | 6. | Ushatai Sathe Vivah Mandal | 50100 |
| 2. | Give India | 332060 | 7. | Mahindra Lifespaces Pvt. Ltd. | 39200 |
| 3. | Give Foundation USA | 19398 | 8. | Rotary Club of Poona West | 35000 |
| 4. | Persistent Foundation | 75000 | 9. | Rotary Club of Pune University | 9600 |
| 5. | Asso. Of Friends of Germany | 65000 | 10. | Vimal Chintaman Trust | 6000 |

## Donations in Foreign Currency

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Shyamal & Lawrence Gearty ...... 3478 | 2 | Sneha Patwardhan ........................ 2154 |

## Personal Donation (Rs.1000 & above)

| No. | Name | Amount | No. | Name | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Arunkumar Pandit | 90000 | 28. | Avinash kelkar | 4500 |
| 2. | Janardan Limaye | 25000 | 29. | Grishma Apte | 3500 |
| 3. | Smita Ranade | 25000 | 30. | Surendra Bhave | 3000 |
| 4. | Kishori Belsare | 20000 | 31. | Preeti Sohoni | 3000 |
| 5. | Sulabha Deuskar | 20000 | 32. | Sheela Deshpande | 2600 |
| 6. | Upendra Karkhanis | 20000 | 33. | Vedika Kulkarni | 2600 |
| 7. | Surendra kelkar | 19000 | 34. | Dr.Malvika Sahastrabuddhe | 2600 |
| 8. | Sujata Kulkarni | 15000 | 35. | Kishor Mushriff | 2501 |
| 9. | Madan Khurjekar | 15000 | 36. | Sanjay Deuskar | 2501 |
| 10. | Leelatai Shintre | 13500 | 37. | Sayali Darvekar | 2500 |
| 11. | Dr.Geetanjali Ratnalikar | 10000 | 38. | Shantanu Divekar | 2001 |
| 12. | Dr.T.K.Parchure | 10000 | 39. | Lalita Bhalerao | 2001 |
| 13. | Dr.Vinay Ratnalikar | 10000 | 40. | Gauri Vishwarup | 4000 |
| 14. | Rajashree Gadgil | 10000 | 41. | Sulochana Khamkar | 2000 |
| 15. | Hema Sohoni | 10000 | 42. | Nirmala Dabake | 2000 |
| 16. | Shriram Gokhale | 10000 | 43. | Khedlekar Brothers | 1001 |
| 17. | Pratima Joshi | 7000 | 44. | Omkar Deshpande | 1001 |
| 18. | Sharada Shintre | 5501 | 45. | Sahastrabuddhe, Vadapurkar | 1001 |
| 19. | Milind Limaye | 5000 | 46. | Satvika Joshi | 1000 |
| 20. | Sudha Agate | 5000 | 47. | Saroj Gujarathi | 1000 |
| 21. | R.M. Deshpande | 5000 | 48. | Nalini Agharkar | 1000 |
| 22. | Neelima Karkhanis | 5000 | 49. | Pratibha Jog | 1000 |
| 23. | Sucheta Chapekar | 5000 | 50. | Satvasheela Samant | 1000 |
| 24. | Dr.Prakash Govitrikar | 5000 | 51. | Jayashree Raste | 1000 |
| 25. | Omkar Darvekar | 5000 | 52. | Mandakini Jagtap | 1000 |
| 26. | Dr.Kunda Jogalekar | 5000 | 53. | Nandkumar Kulkarni | 1000 |
| 27. | V.J. Wagh | 5000 | 54. | Hemlata Muttha | 1000 |

## Gokhale & Gokhale Chartered Accountants

Flat No.1, Heramb, Apartments, 501, Shaniwar Peth, Pune - 411030 Ph. No. : 24450297

### REPORT OF THE AUDITORS

"We have audited the attached balance sheet of BHAGINI NIVEDITA PRATHISTHAN as at 31st March 2012, and the Income & Expenditure Account for the year ended on that date annexed thereto. These financial statements are the responsibility of the management of the trust. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit."

"We conducted our audit in accordance with auditing standards generally accepted in India. Those Standards require that we plan and perform the audit, obtain reasonable assurance about whether the financial statements are free of material misstatements. An audit includes examining, on a test basis, evidence supporting the amounts and disclosures in the financial statements. An audit also includes assessing the accounting principles used and significant estimates made by management, as well as evaluating the overall financial statement presentation. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion."

Subject to the above we report that:

I) We have obtained all the information and explanations to the best of our knowledge and belief, where necessary for the purpose of audit.

II) In our opinion and to the best of our information and explanation given to us:

A) The Balance sheet and Income & Expenditure Account are in agreement with the books of account and the said account gives a true and fair view of the state affairs of the Trust as on 31st March 2012.

B) The accounts subject to and read with the information & notes thereon give the true and fair view of the financial transactions of the Trust.

III) In our opinion the Trust has kept proper books of account.

For Gokhale & Gokhale Chartered Accountants

Place : Pune

Date : 07.07.2012

S.M.Gokhale (Partner)

## NOTES ON BALANCE SHEET AS AT 31.03.2012 AND INCOME AND EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED ON 31.03.2012

**1. SIGNIFICANT ACCOUNTING POLICIES.**

**Fixed Assets and Depreciation**

Fixed assets are state as cost less accumulated depreciation. Depreciation on fixed Assets is provided on Written Down Method, at rates specified under Income Tax Rules.

**Income**

It is policy of the Trust to take into account income by way of grants, donation, interest and other receipts as and when it is actually received.

**Investment**

Investments are stated at cost.

**2. REMUNERATION TO DIRECTORS-** NIL except to Co-opted employee members as under,

| | |
|---|---|
| Head of the organization (including honorarium): | Rs.Nil |
| Remuneration to co-opted member (Vithabai More): | Rs.43,953/- |
| Remuneration paid to other Board Members: | Rs.Nil |
| Consultancy Fees to Consultant: | Rs.12,500/- |
| Highest paid Full Time Regular Staff: | Rs.49,250/- |
| Lowest paid Full Time Regular Staff: | Rs.17,200/- |

| | |
|---|---|
| Total cost of international travel to Members, staff etc.: | Rs.Nil |
| Total Cost of National Travel to Members: | Rs.566/- |
| Total Cost of Local Conveyance to Members: | Rs.31,343/- |
| Total Cost of National Travel to Staff: | Rs.566/- |
| Total Cost of Local Conveyance to Staff etc: | Rs.22,779/- |

**Details of Salaries paid**

| Slab of gross monthly salary (in Rs.) Plus benefit paid to Staff | Male | Female | Total Staff |
|---|---|---|---|
| <5,000 | --- | 13 | 13 |
| 5,001 - 10,000 | --- | 1 | 1 |
| 10,001 - 25,000 | --- | --- | --- |
| 25,001 - 50,000 | --- | --- | --- |
| >50,000 | --- | --- | --- |

Addition to above, one paid consultant and two honorary consultants.

**FOR GOKHALE & GOKHALE**
**CHARTERED ACCOUNTANTS**

**S.M.Gokhale**
**(Partner)**

**FOR BHAGINI NIVEDITA PRATISTHAN**

**Pratima Joshi**
**(President)**

**Rujuta Pitale**
**(Secretary)**

# Bhagini Nivedita Pratishthan, Pune

14/2, Laxminarayan Nagar, Erandwane, Pune 411 004. Ph. : 25431210
Pune - 411 004

## ABRIDGED BALANCE SHEET AS ON 31ST MARCH 2012

| Particulars | Current Financial Year | | Previous Financial Year | |
|---|---|---|---|---|
| | Amount | % | Amount | % |
| **Assets** | | | | |
| Fixed Assets | 4877581.77 | 60.96 | 4825718.77 | 65.23 |
| Investment | 2321754.90 | 29.02 | 1831431.90 | 24.76 |
| Deposits and Advances | 51350.00 | 0.64 | 51850.00 | 0.70 |
| Current Assets | 750890.96 | 9.38 | 688819.76 | 9.31 |
| Income & Expenditure A/c. Balance | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| **Total** | **8001577.63** | **100.00** | **7397820.43** | **100.00** |
| **Liabilities** | | | | |
| Corpus/Endowment Fund | 460873.15 | 5.76 | 405873.15 | 5.49 |
| Earmarked Funds | 6137848.00 | 76.71 | 5706848.00 | 77.14 |
| Loans / Borrowings | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| Current Liabilities and Provisions | 154592.00 | 1.93 | 195313.00 | 2.64 |
| Income & Expenditure A/c.Balance | 1248264.48 | 15.60 | 1089786.28 | 14.73 |
| **Total** | **8001577.63** | **100.00** | **7397820.43** | **100.00** |

## ABRIDGED INCOME AND EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2012

| Particulars | Current Financial Year | | Previous Financial Year | |
|---|---|---|---|---|
| | Amount | % | Amount | % |
| **Income** | | | | |
| Self generated Inocme | 780093.23 | 30.60 | 866320.85 | 41.04 |
| Indian Source | 1437005.99 | 56.37 | 1182859.37 | 56.04 |
| International Source | 332060.23 | 13.03 | 61500.16 | 2.91 |
| **Total ( A )** | **2549159.45** | **100.00** | **2110680.38** | **100.00** |
| **Expenditure** | | | | |
| Programme | 1570840.00 | 65.71 | 1324171.91 | 76.67 |
| Management | 398841.25 | 16.68 | 402906.97 | 23.33 |
| Others ( Transfer to Specific Fund ) | 421000.00 | 17.61 | 0.00 | 0.00 |
| **Total ( B )** | **2390681.25** | **100.00** | **1727078.88** | **100.00** |
| **Surplus / ( Deficit ) (A-B)** | **158478.20** | | **383601.50** | |
| | **2549159.45** | | **2110680.38** | |

# Bhagini Nivedita Pratishthan, Pune

14/2, Laxminarayan Nagar, Erandwane, Pune 411 004. Ph. : 25431210
Pune - 411 004

**ABRIDGED RECEIPT AND PAYMENT ACCOUNT FOR THE YEAR END 31ST MARCH 2012**

| Particulars | Current Financial Year | | Previous Financial Year | |
|---|---|---|---|---|
| | Amount | % | Amount | % |
| **Receipts** | | | | |
| Opening Balance of Cash & Bank | 673037.76 | 17.66 | 460488.74 | 11.63 |
| Self generated Income | 780093.23 | 20.47 | 866320.85 | 21.88 |
| Indian Source | 1769066.22 | 46.41 | 1244359.53 | 31.43 |
| Fixed Deposit Matured | 469678.00 | 12.32 | 1311803.19 | 33.13 |
| Others | 119736.00 | 3.14 | 76200.00 | 1.92 |
| **Total ( A )** | **3811611.21** | **100.00** | **3959172.31** | **100.00** |
| **Payments** | | | | |
| Programme | 1570840.00 | 41.21 | 1324171.91 | 33.45 |
| Management | 96940.25 | 2.54 | 100494.97 | 2.54 |
| Fixed Deposit Renewed | 960001.00 | 25.19 | 1281145.90 | 32.36 |
| Fixed Assets Additions | 353764.00 | 9.28 | 489274.77 | 12.36 |
| Others | 100249.00 | 2.63 | 91047.00 | 2.30 |
| Closing Balance Of Cash & Bank | 729816.96 | 19.15 | 673037.76 | 17.00 |
| **Total ( B )** | **3811611.21** | **100.00** | **3959172.31** | **100.00** |

# संस्थेला भेट देऊन गेलेल्या मान्यवरांचे अभिप्राय

भगिनी निवेदिता प्रतिष्ठानला भेट देण्याचा योग आला. लहान मुलांकरिता चालवली जाणारी अभ्यासिका पाहून समाधान वाटले. तुटपुंज्या साधनांच्या मदतीने चालवलेले काम पाहून आश्चर्ययुक्त आनंद झाला. नेहमी आपण जे वाचत असतो, ऐकत असतो (ज्ञानी माणसांकडून) त्याची सत्यता पटली "कोणत्याही कामामधील यश हे निरपेक्ष बुद्धीने काम करणाऱ्या [illegible] कार्यकर्त्यांवरच अवलंबून असते मशिनवर नाही" खरं आहे नाही कां? संस्थेला व सर्व कार्यकर्त्यांना हार्दिक शुभेच्छा

डॉ विजय कर्णिक
[illegible] १०, २०११
mob. no. (९५२७१४२३४५)

**डॉ. विजय कर्णिक**

सौ. प्रभा इनामदार
१०|६|२०११

**सौ. प्रभा इनामदार**

१५|१०|२०११ आमच्या [illegible] प्रयोगाच्या निमित्ताने आपल्या संस्थेला भेट देण्याचा योग आला. संस्थेच्या कामकाजाची माहिती सौ. [illegible] [illegible] यांनी करून दिली. भागातील मुलांच्या महिलांच्या वैयक्तिक विकासासाठी आवश्यक असा शैक्षणिक सुविधा [illegible] उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याचबरोबर [illegible] दृष्टीने महिलांना [illegible] सोय उपलब्ध आहे. हे सर्व, महिलांनी महिलांच्या विकासासाठी चालवलेले कार्य पाहून खूप छान वाटले. हे कार्य असेच चालू राहण्यासाठी मनापासून शुभेच्छा. भविष्यात मला काही सेवा या संस्थेदारा करण्याची संधी मिळाली तर खूपच आनंद होईल. पुन्हा एकदा मनोभावे शुभेच्छा!

सौ. सौम्यश्री संजय शेवडे
आदगार.

**सौ. सौम्यश्री शेवडे**

२८|२|२०१२

संस्थेला भेट देऊन खूप आनंद झाला. मकसूल अरम पोळीच्या न्याहरीने स्वागत झाले. विज्ञान प्रयोगशाळेतील सुविधा छान आहेत. कॉम्प्युटर लॅबच्या सोई अद्ययावत आहेत. विशेषतः मुलांसाठी e learning ची introduction अतिशय उपयुक्त आहे. शिवणकाम, भरतकाम उपक्रम उपयोगी आहे. हे मोठ्या प्रमाणावर वाढविणे गरजेचे आहे.

डॉ. अस्मिता पटवर्धन
कार्डिफ, यू के

**डॉ. अस्मिता पटवर्धन**

बी आर कुलकर्णी
[illegible] पुणे

आजरोजी [illegible] दिनानिमित्त भगिनी निवेदिता प्रतिष्ठान दिघी या संस्थेला भेट देण्याचा योग आला. संस्थेचे विविध क्षेत्रातील कार्य पाहून आनंद वाटला व समाधान वाटले. जिद्दीने व निस्पृहतेने समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींचा उत्साह पाहून आनंद वाटला. माझ्या त्यांच्या या कार्यास शुभेच्छा व माझ्याकडून शक्य असेल ती मदत करेन.

[illegible]

**श्री. बी. आर. कुलकर्णी**

वार शनिवार
दि. २५|२|२०१२

आज शनिवार २५/फेब्रुवारी रोजी आपल्या संस्थेच्या भगिनी निवेदिता प्रतिष्ठान - दिघी यांच्या तर्फे आयोजित विज्ञान प्रदर्शनास भेट देण्याचा योग आला. सांगायला आनंद होतोय कि, इथे शाळेतील लहान मुलांनी केलेले प्रयोग त्यांनी स्वतःच्या हाताने तयार केले, दिलेले प्रयोगाचे स्पष्टीकरण त्यांच्या प्रयोगाइतकाच खरोखरच उल्लेखनीय होते. याशिवाय या संस्थेमार्फत मला कोणती प्रयोगशाळा ही खूप आवडली आमच्या विद्यालयातील सराव्या पाठांनाही तुमच्या या उपक्रमाचा लाभ मिळाला त्याबद्दल धन्यवाद! तसेच आपल्या संस्थेच्या या कार्यास गुरुकुल अध्यापक विद्यालय, दिघी तर्फे हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

धन्यवाद!

सौ. रुपाली [illegible] शितोळे
अध्यापकाचार्य
गुरुकुल अध्यापक विद्यालय
दिघी पुणे ३५

**सौ. रुपाली शितोळे**

# भगिनी निवेदिता प्रतिष्ठान पुणे

## उपक्रम २०११-२०१२



## भगिनी निवेदिता प्रतिष्ठान पुणे
### संस्थेतर्फे आयोजित विविध सामाजिक उपक्रम

- **विज्ञान केंद्र :** दिघी येथे संस्थेची प्रयोग शाळा – विद्यार्थ्यांसाठी विज्ञानाचे प्रयोग स्वत: करण्याची सुविधा. महिलांसाठी विज्ञान विषयक जाणीव जागृतीसाठी कार्यक्रम.
- **अभ्यासिका :** १ ली ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी शालेय अभ्यासक्रमाला पूरक विविध उपक्रम.
- **संगणक वर्ग :** अद्ययावत संगणक वर्ग १९९२ पासून सुरू. DTP, IT, Tally सारखे सरकारी मान्यताप्राप्त अभ्यासक्रम.
- **रूग्णसेवा प्रशिक्षण वर्ग व नर्सिंग ब्युरो :** महिलांना आर्थिक दृष्ट्यास्वावलंबी बनविण्यासाठी १९ वर्षे नियमितपणे प्रशिक्षण वर्ग चालू.
- **रूग्णालय मदतनीस व स्वागतिका प्रशिक्षण वर्ग :** रूग्णालयाचे व्यवस्थापन व संवाद कौशल्य वाढीसाठी प्रशिक्षण.
- **कॉम्प्युटराईज्ड मशिन एम्ब्रॉयडरी :** स्त्रियांच्या कला कौशल्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन व्यवसाय प्रशिक्षण.
- **आरोग्य विषयक उपक्रम :** पुणे व दिघी येथे मोफत होमिओपॅथी व बाराक्षार दवाखाना.
- **समुपदेशन :** विविध प्रशिक्षण वर्गातील विद्यार्थी, महिला व अपंग व्यक्ती यांना लाभ.
- **वाचा दोष सुधार केंद्र.**
- **सांस्कृतिक कार्यक्रम :** ‘रसमयी’ वाचन मंडळ व इतर साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन.
- **पुरस्कार :** संस्थेतर्फे दिले जाणारे पुरस्कार १) सरस्वती समाजसेवा पुरस्कार २) शारदा साहित्य पारितोषिक.

## Bhagini Nivedita Pratishthan Pune
### Various Social Activities by the organisation

- **Science Centre :** Laboratory at Dighi, arranging Scientific excursions and Science experiments for school children. Science Awareness Programs for women.
- **Abhyasika :** To help students from 1st to 7th standard to understand school syllabus and impart related knowledge in a fun and learn way.
- **Computer Training :** Since 1992 - Latest Computer Lab. Govt. recognised Certificate courses like DTP, IT, Tally etc.
- **'Rugna Seva' Training and Nursing Bureau :** Conducting training courses since last 19 years to help women to become economically independent.
- **Training course for Hospital Receptionist and Hospital Assistance.**
- **Computerised Machine Embroidery :** To enable women to become successful professionals with the help of modern technology.
- **Health Related Activities :** Free Homoeopathic Dispensary and 'Barakshar' clinic at Pune and Dighi.
- **Counselling :** For students, women, handicapped individuals and others.
- **Speech Correction Centre.**
- **Cultural Activities :** 'Rasamayi' Book Club for the last 9 years. Organised various cultural and literary events.
- **Awards Instituted :** 1) 'Saraswati Samajseva Puraskar' 2) 'Sharada Sahitya Paritoshik'